माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ४२९/२०२३**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. शुभराज मधुकरराव गजरे, रा. वार्ड क्र. २, सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठाण, क्वार्टर नं. ३, पशुवैद्यकिय दवाखान्यासमोर, गुळवाडी, सेवाग्राम, ता.जि. वर्धा-४४२१०२ | पर्यवेक्षक, महात्मा गांधी माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विद्यालय, आरमोरी, ता. आरमोरी जि. गडचिरोली | मुख्याध्यापक, महात्मा गांधी माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विद्यालय, आरमोरी, ता. आरमोरी जि. गडचिरोली |

**सुनावणी दिनांक :- ०७.०१.२०२६**

**१. उपस्थिती —**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज —**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : १४.०२.२०२३

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २०.०२.२०२३

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मागितलेली माहिती ही खाजगी असल्याबाबतचा निर्णय देवून हेतुपुरस्सरपणे माहिती नाकारणे.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केली आहे.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १७.०५.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही.

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : २०१७-१८ ते माहिती मिळेपर्यंतचा

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : महात्मा गांधी उच्च माध्यमिक विद्यालय आरमोरी या विद्यालयातील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांची यादी तसेच त्यांचे समायोजन झालेल्या शाळेची माहिती, समायोजन झाल्यानंतर त्या शाळेत शिक्षक भरती करीता दिलेल्या जाहिरात पूर्व परवानगीची सत्यप्रत, सदर शिक्षक नियुक्तीस मान्यता मिळण्याकरीता शाळेने पाठविलेल्या मान्यता प्रस्तावाच्या सत्यप्रती, जाहिरातीच्या टाचणाची सत्यप्रत, नियुक्त शिक्षकांची शैक्षणिक तसेच व्यावसायिक अर्हता प्रमाणपत्राच्या सत्यप्रती, स्वंयम रोजगार कार्यालय समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग इत्यादी कार्यालयाकडून मागविण्यात

आलेल्या उमेदवार याद्यांच्या सत्यप्रती, नियुक्त शिक्षक कर्मचाऱ्यांच्या मान्यता व वैयक्तिक मान्यतेच्या सत्यप्रती तसेच त्यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्राच्या सत्यप्रती. रोस्टरच्या सत्यप्रती. आकृतीबंध संचिकेची सत्यप्रत.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ नुसार विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद/माहिती दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील —**

| | | |
|---|---|---|
| (१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक | : | ०५.०७.२०२२ |
| (२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | उपलब्ध नाही. |
| (३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण | : | विहीत मुदत संपुनही माहिती न देणे. |

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा गांधी माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विद्यालय, आरमोरी, ता. आरमोरी जि. गडचिरोली यांनी दिनांक १३.१०.२०२२ रोजी आदेश पारीत केले आहे. त्यात मागितलेली माहिती ही माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ च्या पोटकलम (त्र) मधील तरतुदीनुसार जी माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यावर नाही अशी आणि लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषत: जी त्रयस्थ पक्षाबरोबर उदभवलेल्या वैयक्तिक वादाचे अनुषंगाने मागविलेली माहिती ही शासनाचे परिपत्रक दि. १७.१०.२०१४ व दि. १४.१०.२०१९ नुसार देणे जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, महात्मा गांधी उच्च माध्यमिक विद्यालय आरमोरी यांना बंधनकारक नाही. जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. शिवाय दोन्ही सुनावणीस श्री. शुभराज मधुकरराव गजरे रा. सेवाग्राम वर्धा हे अनुपस्थित होते. त्यामुळे एकतर्फी निर्णय घेवून श्री. शुभराज मधुकरराव गजरे रा. सेवाग्राम वर्धा यांचा अपील अर्ज फेटाळण्यात येवून सदर प्रकरण नस्तीबध्द करण्यात येत आहे, असे आदेश पारीत केले.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही.

२. आज सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, महात्मा गांधी उच्च माध्यमिक विद्यालय आरमोरी, श्री. विलास नामदेव आंबोरकर व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा गांधी उच्च माध्यमिक विद्यालय आरमोरी, श्री. साईनाथ गंगाराम अद्दलवार उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, अपिलार्थी यांचा दिनांक १७.०५.२०२२ रोजीचा माहिती अर्ज प्राप्त झाला नसल्यामुळे अपिलार्थीस विहीत मुदतीत प्रतिसाद देता आली नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी दाखल केलेला प्रथम अपील अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. गडचिरोली यांचेकडून दिनांक ०२.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०२.०९.२०२२ व दिनांक २७.०९.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. परंतु दोन्ही सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असल्याने दिनांक १३.१०.२०२२ रोजी आदेश पारीत केले आहे. त्यात मागितलेली माहिती ही माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ च्या पोटकलम (त्र) मधील तरतुदीनुसार जी माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यावर नाही अशी आणि लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषत: जी त्रयस्थ पक्षाबरोबर उदभवलेल्या वैयक्तिक वादाचे अनुषंगाने मागविलेली माहिती ही शासनाचे परिपत्रक दि. १७.१०.२०१४ व दि. १४.१०.२०१९ नुसार देणे जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, महात्मा गांधी उच्च माध्यमिक

विद्यालय आरमोरी यांना बंधनकारक नाही. जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. शिवाय दोन्ही सुनावणीस श्री. शुभराज मधुकरराव गजरे रा. सेवाग्राम वर्धा हे अनुपस्थित होते. त्यामुळे एकतर्फी निर्णय घेवून श्री. शुभराज मधुकरराव गजरे रा. सेवाग्राम वर्धा यांचा अपील अर्ज फेटाळण्यात येवून सदर प्रकरण नस्तीबध्द केले आहे.

६. निष्कर्ष —

१. अपिलकर्ता यांनी दाखल केलेल्या व्दितीय अपिलावर आज सुनावणी घेण्यात आली. आजच्या सुनावणी संदर्भात अपिलार्थी यांना टपालाव्दारे सुनावणी नोटीस पाठविण्यात आली होती तसेच अपिलार्थी यांच्या WhatsApp नंबर वर सुध्दा सुनावणी नोटीसची प्रत पाठविण्यात आली होती. तरी देखील आज सुनावणीत अपिलार्थी हे आयोगास कोणतीही पूर्व सुचना न देता अनुपस्थित आहेत. ही बाब गंभीर आहे. कारण अपिलार्थी यांनी "मागितलेली माहिती ही खाजगी असल्याबाबतचा निर्णय देवून हेतुपुरस्सरपणे माहिती नाकारली आहे," असे कारण नमूद करुन आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले होते. त्यामुळे सदर सुनावणी आयोजित करण्यासाठी आयोगाचा मौल्यवान वेळ व पैसा याचा जो अपव्यय अपिलार्थी यांच्या अनुपस्थितीने झाला, त्याला जबाबदार कोण? अपील करुनही अपिलार्थी यापुढे सुनावणीस गैरहजर राहिले तर, तद्नंतर त्यांचे अपील स्विकारायचे किंवा नाही, याचा निर्णय आयोगाला घ्यावा लागेल. याची कटाक्षाने अपिलार्थी यांनी नोंद घ्यावी.

२. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कृती माहिती अधिकार अधिनियम २००५ शी सुसंगत अशीच आहे.

मात्र स्वत:ची बाजू मांडण्यासाठी अपिलार्थी हे कोणतीही पूर्व सूचना न देता आज झालेल्या सुनावणीला गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. असे असले तरी प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा गांधी उच्च माध्यमिक विद्यालय आरमोरी, श्री. साईनाथ गंगाराम अद्दलवार यांनी केलेला युक्तीवाद आणि सादर केलेले दस्तावेज लक्षात घेता, प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**प्रस्तुतचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★ सत्यमेव जयते

**(गजानन निमदेव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०७.०१.२०२६**

जावक क्रमांक 9383 दिनांक 17 FEB 2026